

# भारतीय चित्रपट

लेखांक ४ था.

रा. रा. धुंडिराज गोविंद फाळके.

"सत्य संकल्पाचा । दाता भगवान । सर्व करी पूर्ण । मनोरथ ॥"

लेखांक नं. २ व नं ३ हे निराशेच्या काळया कुट्ट अंधकारांत बसून लिहिले. त्यावेळीं आत्मविश्वासाची ज्योती स्नेहशून्य झाल्यानें अतिशय मिणमिण करीत होती. जड देहांतील रसमय द्रव्यांचा क्षणेक्षणीं होम करून शरीर शुष्क होईपर्यंत, किंबहुना शुष्क झाल्यावर सनकाड्यांसारख्या इंधनांनीं ती ज्योती ज्वलत् ठेवीत ठेवणें चाललें होतें. प्राणज्योतीबरोबरच आत्मविश्वासाची ज्योती अंतर्धान पावणार काय? नाहीं. माझी चैतन्य वटिका, माझी अमृत संजीवनी, माझा व्याधिपरित्राण, माझी सौभाग्य कंठी, माझा आतंकनिग्रह, माझा प्राण, माझा नाथ, माझें दैवत, माझें सर्वस्व भगवान् श्रीकृष्ण, माझा स्नेहसागर भगवान् श्रीकृष्ण, गीतारूपानें मजवर स्नेहाच्या धारा सोडीत असतां कोणती ज्योती विझेल? कोणत्या झंझावाताची तिला विझविण्याची छाती आहे?

\+ + + +

दोन तपें काष्ठवत् देह झिजविल्यावर भगवंतांनीं दयार्द्र दृष्टीनें मजकडे पाहिलें. लेंकराचा अंत पाहणें आतां पुष्कळ झालें असें त्यास वाटलें. द्रवीत होऊन इतर लेंकरांच्या अंतःकरणांत त्यांनीं प्रवेश केला व त्यां करवीं माझें-बाळाचें पोट पुरविलें.

आईच्या, लक्ष्मीच्या लाडानें पोर बिघडेल, उच्छृंखल होईल, स्वतःस विसरेल, म्हणून भगवंतांनीं माझा शिक्षणक्रम चालू असतां तिच्यापासून मला दूर ठेविलें. तिची माझी नजरानजरही फारशी होऊं दिली नाहीं. प्रवेशपरीक्षा झाल्यावर आतां मला कुरवाळीत आहे. माझे पापे घेत आहे. मला पोटाशीं घेऊन जगभर नाचवीत आहे. मला दृष्ट लागूं नये म्हणून माझ्या गळयांत सोन्याचे ताईत, दोरे बांधीत आहे. आई! माते! लक्ष्मी! मला असाच पदराखालीं घेऊन निष्कलंक ठेव. मला केव्हांही मोठा होऊं देऊं नकोस. भगवंता! कृष्णचंद्रा! तुम्हाला देखील वारंवार बालक होऊन क्रीडन करावेंसें वाटतें ना? बालक होण्यांत—निर्विकार, निर्मत्सर; निर्लोभ होऊन राहण्यांत—किती सुख आहे! देवा! मी सदोदित बालक रहावें, जन्मोजन्मीं बालक रहावें, दाढीमिशांचे पुंजके आले तरी अंतर्यामीं बालक रहावें असा आशीर्वाद द्या.

* * *

हौदाचा बंगला म्हणजे नाशिकचें यात्रेचें ठिकाण नव्हे. पंचवटी, तपोवन, गोदावरी, श्रीराम ह्यांच्या अंतःकरणपूर्वक दर्शनानें लभ्यांश तरी होईल. जातां येतां केव्हांतरी वाटेवरच असलेल्या कारखान्यांत शिरावें, जिवाला करमणूक करून घ्यावी किंवा परवानगी न मिळाल्यास वर्तमानपत्राकडे धांव घ्यावी हें कित्येकांकडून घडून आलेलें आहे. हा कारखाना म्हणजे सार्वजनिक मालमत्ता तर नव्हे? लेखक अडचणींत होता तेव्हां असल्या वीरांपैकीं किती त्याच्या उपयोगी पडले? हजारों यात्रेकरूंपैकीं रोज एक



दोन जरी येऊन गेले तरी कारखान्याची फार खोटी होते. चार शब्द त्यांशीं बोलावे तर व्यर्थ कालक्षेप होतो. न बोलावें तर रुसवा होतो! अगोदर पत्र पाठवून, भेटीची वेळ यथाविधि ठरवून, मला सवड असतां प्रेक्षक आल्यास ते वंदनीय आहेत. त्यांची जिज्ञासा यथाशक्ति तृप्त करण्याची व्यवस्था होईल. इतर यात्रेकरूं प्रेक्षकांनीं एखादें सोन्याचें नाणें आणून पुढें ठेवावें व कारखान्यास प्रदक्षिणा घालून निमूट परत जावें!

* * *

'दे दाता.' 'दे दाता' असा वर्षानुवर्ष टाहो फोडण्यांत माझें तोंड इतकें थकलें आहे कीं, आतां किंचित् ओढाताणीनें तें फाटण्याचा संभव आहे. माझी फोनोग्राफची प्लेट इतकी घासली गेली आहे कीं, ती आतां दुभंग होईल. निमंत्रित प्रेक्षकांनीं देखील अत्यंत आवश्यक व जरूर तरच प्रश्न विचारून भेटीचा समारोप करावा.

* * *

माझे चित्रपट "स्वदेशी" आहेत. म्हणजे स्वदेशी भांडवल, स्वदेशी मालक, स्वदेशी नौकरी व स्वदेशी कथानकें; कारखान्यास लागणारें प्रत्येक सामान व यंत्रें हीं इकडे औषधासही मिळावयाचीं नाहींत. तीं सर्व विलायती आहेत. माझ्या एका व्यवसायबंधूच्या जाहिरातींत "पूर्ण स्वदेशी" असें वाचलें. "पूर्ण"चा अर्थ मला कळत नाहीं! "संजीवनी"! "अमृतसंजीवनी"!! "मदनामृत संजीवनी"!!! मदन विलासामृत संजीवनी"!!!! तसेंच "स्वदेशी" "पूर्ण स्वदेशी"! तिसरी "परिपूर्ण स्वदेशी"!! बा, हिंदुस्थाना! तूं अगोदरच चेष्टापात्र झाला आहेस! त्यांत छापखान्यांतले टाईप तुला मदत करीत आहेत! दुसरें काय?

त्याच जाहिरातींत "परदेशांत न जातां तयार केलेलें" हें वाक्य वाचून लेखकासंबंधीं आदर उत्पन्न होतो. माझी ती छाती नाहीं. मी तीन वेळां विलायतेस जाऊन आलों तरी चवथ्यांदा जाण्याची माझी इच्छा आहे. जाण्याची जरूरी आहे निरीक्षण, शिक्षण व सुधारणा यांना केव्हांही अंत नाहीं.

"परदेशांत न जातां तयार झालेलें" ह्या वाक्यानें राष्ट्राचें एक महत्कार्य पार पडत आहे हेंही खरें आहे. पुण्यामुंबईबाहेरील तेली, तांबोळी शाळामास्तर, पाटीलकुळकर्णी ह्यांस वरील एका वाक्यानेंच "होमरूल"च्या पात्रतेचा अभिमान उत्पन्न होईल व त्यांचे बाहु स्फुरण पावतील. मॉन्टेग्यु साहेब, मराठी शिका व आमचें जाहिरातींतील सामर्थ्य वाचा!!

मी स्वतःस "मी" "मी" असें केव्हांही म्हणवीत नाहीं. "लंकादहन" "श्रीकृष्ण जन्म" ह्या माझ्या अल्पकृतींकडे लाखों प्रेक्षक बोटें दाखदाखवून त्यांस "तू" "तू" असें म्हणतात! त्यास मी काय करूं? माझ्या ५ वर्षांच्या मुलीस सुवर्णपदक देतात, मी त्यांचा हात धरूं?

* * *

वाचकांस नम्र विनंती हीच आहे कीं, ही लेखमाला येथेंच आटोपती घेण्याचा विचार आहे. राहिलेले विषय माझ्या "पेनशन" आयुष्यांत बैठे बैठे मी पुढें केव्हां तरी पुरे करीन. तूर्त लेखमालेचें कार्य झालें आहे. लेखमालेनें कार्य केलें आहे. भगवानानें मजवर कृपाछत्र धरलें आहे. सिनेमाच्याद्वारें राष्ट्राची सेवा व्हावी, कलेंत उत्तरोत्तर सुधारणा व्हावी, कला अधिकाधिक लोकप्रिय व्हावी ही इच्छा करून वाचकांची रजा घेतों.

सुचित्रपट योजना ।
सरस दिव्य पुण्या कथा ॥
यथार्थ भव दर्शनें ।
सहज दाविती सत्पथा ॥
नसे सुलभ कार्य हें ।
परि हरिकृपा जैं घडे ॥
मुके मधुर बोलती ।
शिखर पंगु तैसा चढे ॥१॥



रा. फाळके.

कुमार वसंत फाळके, कुमारी मंदाकिनी फाळके.

रा. फाळके यांच्या सर्वमान्य झालेल्या " कृष्णजन्म " या चित्रपटांत कुमारी मंदाकिनीनें श्रीकृष्णाचें काम अत्यंत प्रेक्षणीय केलें आहे.